**महाराष्ट्र राज्यातील वडोदरा मुंबई द्रुतगती मार्गाचा मुख्य आखणीच्या किमी २६.५८२ (स्पर आखणीचे डिझाइन किमी (०+०००) पासून सुरू होणाऱ्या व एम.एम.आर.डि.ए. च्या मल्टि मोडल कॉरिडोर सोबतच्या प्रस्तावित जंक्शन (स्पर आखणीचे डिझाईन किमी (७९+७८३) ला संपणाऱ्या ८ पदरी स्परची विकास परियोजना**

---

महाराष्ट्र राज्यातील वडोदरा मुंबई द्रुतगती मार्गाचा मुख्य आखणीच्या किमी २६.५८२ (स्पर आखणीचे डिझाइन किमी (०+०००) पासून सुरू होणाऱ्या व एम.एम.आर.डि.ए. च्या मल्टि मोडल कॉरिडोर सोबतच्या प्रस्तावित जंक्शन (स्पर आखणीचे डिझाईन किमी (७९+७८३) ला संपणाऱ्या ८ पदरी स्परची विकास परियोजनेची जनसुनावणी दिनांक १६ मार्च २०२१ रोजी दुपारी २ वाजता सर्व्हे नंबर ७/१६, विनायक वुडूसच्या शेजारी, रिलायन्स रोड, वाहुली गाव, तालुका कल्याण, जि. ठाणे येथे आयोजित करण्यात आली होती.

सदरची जनसुनावणी घेण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयीन आदेश क्रमांक BO/JD(WPC)/PH/B_210222_FTS_0244 dated २२/०२/२०२१ च्या अन्वये खालील पॅनल मेंबर्स नेमण्यात आलेले होते.

| | | |
|---|---|---|
| १) | डॉ. शिवाजी पाटील,<br>अप्पर जिल्हा दंडाधिकारी, ठाणे | अध्यक्ष |
| २) | श्री. शंकर वाघमारे<br>प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कल्याण | सदस्य |
| ३) | श्री. ज.शं. हजारे, उप-प्रादेशिक अधिकारी, भिवंडी<br>म.प्र.नि. मंडळ, कल्याण | निमंत्रक |

श्री ज.शं. हजारे, निमंत्रक यांनी माननीय अध्यक्ष, सदस्य जनसुनावणी पॅनल, लोकप्रतिनिधी उपस्थित स्थानिक नागरिक यांचे स्वागत करून त्यांनी सदर जन सुनावणी ही इ आय ए अधिसूचना २००६ नुसार हा प्रकल्प अधिसूचनेच्या अनुसूचीच्या क्रमांक ७(एफ) मध्ये मोडतो आणि हा ए श्रेणीतील प्रकल्प आहे व यासाठी पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय (एम ओ ई एफ सी सी) भारत सरकार कडून पूर्व पर्यावरण मंजुरी आवश्यक आहे. उप-प्रादेशिक अधिकारी, भिवंडी, म.प्र.नि. मंडळ यांचेकडे सदरच्या नियोजित प्रकल्पाची जनसुनावणी घेण्यासाठी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांचेकडून विनंती अर्ज प्राप्त झाला. त्यानुसार (इ आय ए) अधिसूचना २००६ च्या अनुसूचीच्या क्रमांक ७(एफ) मध्ये मोडतो व हा ए श्रेणीतील प्रकल्प असल्यामुळे सदर प्रकल्पाच्या मंजुरी साठी, जण सुनावणी घेणे व हा प्रकल्प ज्या मार्गातून जातो तेथील स्थानिक नागरिक, शेतकरी यांना सदर प्रकल्पाची विस्तृत माहिती देण्यासाठी ही जण सुनावणी आयोजित करण्यात आली आहे, असे सुचित केले.

२७ फेब्रुवारी २०२० रोजी झालेल्या तज्ञा मूल्यांकन समितीच्या २३२ व्या बैठकीमध्ये सदर प्रकल्पाची चर्चा होऊन तज्ञा मूल्यांकन समितीने टी ओ आर देण्याची शिफारस केली. त्यानुसार एमओईफसीसी ने दिनांक १६ मार्च २०२० च्या पत्रांन्वये इ आय ए अभ्यास करण्यासाठी टी ओ आर जारी केले. त्यानुसार राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, प्रकल्प प्रवर्तक यांनी इ आय ए अहवाल तयार केला.

इ आय ए नोटिफिकेशन २००६ च्या तरतुदी नुसार एक महिना आधी, स्थानिक वर्तमान पत्र मराठी दैनिक "सकाळ" व इंग्रजी दैनिक "इंडियन एक्सप्रेस" या वृत्तपत्रांमध्ये अनुक्रमे मराठी व इंग्रजी या भाषेचे जाहीर सूचना दिनांक १२/०२/२०२१ रोजी, प्रसिद्ध करण्यात आली. सदर प्रकल्पासंबंधी माहिती असलेले दस्तावेज, पर्यावरण आघात मूल्याकन अहवाल, मराठी व इंग्रजी भाषेत, पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे, अप्पर जिल्हा दंडाधिकारी, ठाणे, तहसीलदार, भिवंडी, कल्याण, अंबरनाथ तहसील कार्यालय, म.प्र.नि. मंडळ मुख्यालय सायन मुंबई, संबंधित ग्रामपंचायत कार्यालय इथे तसेच प्रादेशिक कार्यालय, कल्याण, उप-प्रादेशिक कार्यालय, कल्याण-१,२ व भिवंडी, म.प्र.नि. मंडळ, कल्याण इथे उपलब्ध करण्यात आल्या होत्या. सदर प्रकल्पाबाबत आपल्या सूचना लेखी स्वरूपात जाहिरात प्रसिद्ध झाल्या पासून ३० दिवसाचे आत प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, कल्याण यांचेकडे पाठविण्यात याव्यात असे आवाहन करण्यात आले होते. श्री. हजारे यावेळी एक तक्रार मेल व्दारे प्राप्त झाल्याचे सांगितले. तसेच या सुनावणीबाबतची रुपरेषा सांगितली. यानंतर प्रकल्प प्रयोजक तांत्रिक माहिती देतील. यानंतर उपस्थित नागरीकांनी आपल्या शंका आक्षेप आपले नाव सांगुन प्रकल्प प्रयोजकाना विचारावेत त्या सर्वांची नोंद घेतली जाईल व पुढे इतिवृत्तामधे पाठविली जाईल.

डॉ. शिवाजी पाटील, अप्पर जिल्हा दंडाधिकारी आणि अध्यक्ष जनसुनावनी समिती, यांनी सर्वांचे स्वागत करून प्रकल्प प्रवर्तक यांना, सदर प्रकल्पाबाबत उपस्थितांना, परिपूर्ण सादरीकरण करावे असे सुचविले, तसेच जनसूनावनीस आलेल्या सर्व उपस्थितांना सादरीकरणानंतर त्यांच्या पर्यावरण विषयक काही सूचना, तक्रारी असल्यास त्या मांडाव्यात असे आवाहन केले.

श्री. शिवाजी पवार, (DHM) Tech, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांनी जनसुनावणी समिती व उपस्थितांचे स्वागत केले, व पुढे त्यांनी प्रस्तावीत आठ पदरी वडोदरा मुंबई द्रुतगती मार्गाची निकड विशद केली, आणि पुढे असे स्पष्ट केले कि सद्या जुना NH_४ जेएनपिटी व मुंबई पुणे एक्सप्रेस वे कडून सद्या होणारी वाहतुकी मुळे, वाहतूक कोंडी व वाहतुकीत येणारे अडथळे विशद केले. म्हणून मुंबई वडोदरा द्रुतगती मार्गाने वाहतूक अत्यंत वेगवान कशी होईल व वाहतूक कोंडी कशी टाळण्यात येईल हे विशद केले. तसेच या प्रकल्पामुळे मुंबई वडोदरा प्रवास ३ ते ४ तासांनी कमी होईल, तसेच हे अंतर २२ किमी ने कमी होईल, त्यामुळे दिल्ली मुंबई हे अंतर ही कमी होईल. यामुळे सुलभ आणि सुरक्षित रहदारी साध्य होईल, तसेच प्रवासाच्या वेळेत, इंधन आणि वाहनांच्या देखभाल खर्चात बचत होईल, सदर प्रकल्प महाराष्ट्रातून जात असून, त्याचा आरंभ कोशिंब गाव जिल्हा पालघर इथे होऊन, तो मोरबे गाव जिल्हा रायगड इथे समाप्त होतो, या प्रकल्पाची SPUR संरेखन एकूण लांबी ७९.७८३ किमी आहे. पैकी ५५.२६० किमी ठाणे जिल्ह्यात तर उर्वरित ५.६२३ किमी रायगड जिल्ह्यात व १८.९०० पालघर जिल्ह्यात येते, त्यांनी पुढे असेही स्पष्ट केले की, या प्रकल्पास विविध वैधानिक मंजुरी प्राप्त करण आवश्यक आहे, जसे की पर्यावरण विभाग, CRZ मंजुरी, वन मंजुरी, ESZ मंजुरी, MO EFCC इत्यादी सदर ८ लेन प्रोजेक्ट वर ८ पदरी विकास योजनेमध्ये द्यायच्या विविध सुविधा जसे की, उड्डाणपूल, वाहन तळ तसेच ट्रक टर्मिनल, टोल प्लाझा, स्वछता गृह इत्यादी सदर प्रकल्पाचा प्रस्तावित खर्च रुपये ५,२४३ कोटी आहे.

ईआयए मार्गदर्शिका मॅन्युअल फॉर हाय वे नुसार सखोल, पर्यावरणीय आघात मूल्यांकन करण्यात आले आहे, त्यानुसार त्या प्रकल्पाच्या सभोवताली असणारे हरित पट्टे, वनक्षेत्र, इत्यादींच्या जपणुकीसाठी करण्यात आलेल्या उपाय योजना यांची माहिती दिली, तसेच सभोवताली असणारे पाणी साठे, हवा, प्रदूषण रोखण्यासाठी चे उपाय, ध्वनी प्रदूषण वाहतूक आवाज रोकण्यासाठी रुपये ४८ कोटींची तरतूद करण्यात आल्याचे सांगितले.

त्यांनी पुढे असे निदर्शनास आणून दिले की सदर प्रकल्प, फक्त कामावारी नावाच्या एका मोठ्या नदीला ओलांडून जातो, त्यांनी प्रकल्प मार्गातील सर्व धरणे, नद्या, तलाव इथे पाण्याची गुणवत्ता तपासली आहे. तसेच वन्य जीव, पक्षी अभयारण्य, आदिवासी विभाग, वन विभाग येथील पर्यावरणीय अभ्यास करून येथील जलस्थरांचे योग्य ते नियोजन करण्यात येणार आहे. हा मार्ग कोणत्याही पक्षी अभयारण्य वा वन्यजीव अभायारण्यातुन जात नाही.

या मार्गावर अपघात टाळण्यासाठी योग्य ते उपाय योजले आहेत. तसेच काही ठिकाणी नियंत्रण केंद्र स्थापित करून योग्य मदत पोहोचवली जाईल याची व्यवस्था केलेली आहे. त्यानी पुढे असे नमूद केले की जमिनी ज्या राष्ट्रीय हिताच्या प्रकल्पासाठी संपादित कराव्या लागणार आहेत, त्यांना त्यांचा योग्य मोबदला देण्यात येणार आहे, तरच या महामार्गाच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात वृक्षरोपन करण्यात येणार आहे. तसेच पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा गटार योजना राबविण्यात येईल.

तसेच स्थानिक नागरिकांना आपली वाहने, जनावरे व पादचाऱ्यासाठी वेगळे भुयारी रस्ते बांधण्यात येणार आहेत. तसेच टोल प्लाझाची ही उभारणी होईल असे नमुद केले.

सन्माननीय अध्यक्ष जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आपली मते मांडण्याचे आवाहन केले.

श्री. नरेश सुरेशी --रायता गावचे रहिवासी प्रकल्प पिढीत- त्यानी असे स्पष्ट केले की २ वर्षापूर्वी असेच अप्पर जिल्हाधिकारी यांनी आम्हास एक प्रकल्पासाठी जमिनी संपादित करण्यासंबंधात आमचं म्हणने जाणण्यासाठी बोलावले परंतु आम्ही दिलेली मते किंवा हरकती यांची कुठलीही दखल घेतली गेली नाही, उलट रायता गावातील ४० एकर जमीन मात्र संपादित करण्यात आली. आमचा परिसरच पुरग्रत म्हणून ओळखला जातो. नदीचे पुराचे पाणी आमच्या शेतात पावसाळ्यात जमा होते. अशातच हा रस्त्याचा प्रकल्प राबवला गेला तर रस्ता उंच होऊन आमच्या जमिनी खोलगट भागात जातील. त्यामुळे पाण्याचा निचरा न होता आमच्या शेतीचे अपरिमित नुकसान होईल.

सन्माननीय अध्यक्ष यानी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) च्या अधिकाऱ्यांना या तक्रारीची दखल घेण्यास सांगितले व याबाबतीत आपण स्पष्टीकरण द्यावे असे सुचविले. श्री. शिवाजी पवार -भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) यांनी असे स्पष्ट केले की, हा द्रुतगती महामार्ग परिसरातील शेत जमिनीच्या पेक्षा वरच्या उंचीवर असेल परंतु पावसाळ्यातील द्रुतगती मार्गावरील पाणी व्यवस्थित वाहून जाण्यासाठी आजूबाजूच्या शेतजमिनीत न पसरता रस्त्याच्या दुतर्फा भुयारी गटारी योजना राबविण्यात येणार आहेत असे सुचित केले.

श्री. अविष जुवारी, वकील आणि उपसरपंच वाहुली गाव यांनी सदर प्रकल्पासाठी जनसुनावणी आयोजित करून प्रकल्पमुळे बाधित होणाऱ्या रहिवासी आणि शेतकरी यांची मत जाणून घेतली जातात, याबद्दल आभार मानले व त्यांनी असेही नमूद केले की ५ वर्षांपूर्वी अशाच जमिनी संपादित करताना स्थानिक शेतकरी यांना जनसुनावणीसाठी बोलावले असते तर त्यांनाही योग्य तो आर्थिक लाभ मिळाला असता. या जनसुनावणी ची सुद्धा वेळेवर माहिती मिळाली नाही. ज्या शेतकऱ्यानी अशा विकास कामासाठी जमिनी दिल्या आणि दिल्या जाणार आहेत, त्यांना सरकार कडून योग्य तो मोबदला मिळत नाही. या जनसुनावणी ऐकून देखील आमच्या तक्रारींची दखल घेऊन आम्हाला योग्य तो न्याय मिळणार आहे का??

माननीय अध्यक्ष यांनी स्पष्ट केले की ही जनसुनावणी पर्यावरण विषयक बाबींसाठी आहे. जमीन संपादन मोबदला या विषयावर नाही.

श्री अविष जुवारी यांनी विचारले की पर्यावरण विषयक तक्रारी आम्ही कोणाकडे करायच्या?

माननीय अध्यक्ष यांनी स्पष्ट केले की तुम्ही इथे MPCB चे अधिकारी उपस्थित आहेत त्यांचेकडे तुम्ही तक्रारी देऊ शकता.

श्री. अविष जुवारी यांनी असे सूचित केले की जमीन संपादित करण्यापूर्वी शेतकऱ्यांना विश्वासात घेण्यात यावे. या प्रकल्पाचे फायदे, तोटे विशद करण्यात यावेत.

माननीय अध्यक्ष यांनीं भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) च्या अधिकाऱ्यांना या मुद्यावर उत्तर देण्यास सांगितले.

श्री. शिवाजी पवार भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) यांनी असे स्पष्ट केले की हा प्रकल्प राष्ट्रीय विकासाच्या दृष्टीने महत्वाचा असून शासन देशहितासाठी जमीन संपादित करत असते. आम्हीं स्थानिकांच्या सोयीसाठी स्वतंत्र्य मार्गिका तयार करणे, त्यांच्या जनावरांसाठी भूमिगत मार्गिका तयार करणे, एक्सप्रेस वे मार्गिका संहितेतिल तरतुदी नुसार प्रत्येक ५०० मीटर नंतर भूमिगत मार्गिका तयार करण्यात येतील. त्यांनी असेही सांगितले की, स्थानिकांनी आपल्या सूचना व तक्रारी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) कडे लिखित स्वरूपात पाठवाव्यात आम्ही त्याला योग्य ते ऊत्तर देऊ.

श्री अविष जुवारी यांनी विचारणा केली की, ५०० मी. नंतर क्रॉसिंग रस्त्याची तरतूद भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) कायद्यात आहे का?

माननीय अध्यक्ष यांनी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) च्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या की, स्थानिक नागरिकांना जास्तीत जास्त वाहतूक सुविधा, विकासाच्या सुविधा कशा देता येतील व क्रॉसिंग किंवा भुयारी मार्ग ची सोय कशी देत येईल याकडे लक्ष द्या.

श्री. नरेश सुरेश रायता गावचे रहिवासी यांनी रस्त्याचे काम चालू असताना दिवसा व रात्री ध्वनि प्रदूषण याचा अभ्यास झाला आहे का?

श्री. शंकर वाघमारे, प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ यांनी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) च्या अधिकाऱ्यांना ध्वनी पातळीचा अभ्यास जो तुमच्या प्रोजेक्ट समरीत समाविष्ट केला आहे त्याची माहिती देण्यात यावी असे सुचित केले.

माननीय अध्यक्ष यानी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) च्या अधिकाऱ्यांना सूचित केले की त्यांनी ध्वनी पातळीबाबत नागरिकांना माहिती द्यावी, तसेच शेत जमिनी पूरग्रस्त कशा होणार नाहीत याची दखल घ्यावी.

श्री. शिवाजी पवार भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) यांनी स्पस्ट केले की, ध्वनी पातळीचे मूल्यांकन सभोवताली ६ ठिकाणी करण्यात आले.

दिवसा व रात्रीच्या ध्वनी ची पातळी निर्धारित मर्यादेत आढळून आली. दिवसा ५४.३ dB आणि रात्री ४३.९ dB एवढी आढळून आली आहे. सदर ध्वनी पातळी मर्यादेपेक्षा जास्त नाही. त्यांनी पुढे असे स्पष्ट केले की, प्रकल्प चालू असताना व पूर्ण झाल्यावर सुद्धा ध्वनी पातळी मर्यादित ठेवण्यासाठी ध्वनी रोधक उपाय योजना केली जाईल. त्यांनी पुढे असेही स्पष्ट केले की द्रुतगती मार्गावरील पावसाचे पाणी आजूबाजूच्या शेत जमिनीत जाणार नाही यासाठी त्या मार्गाचा दोन्ही बाजूंनी भूमिगत गटारे बांधली जातील.

श्री अविष जुवारी यांनी द्रुतगती मार्गा खालून जाणाऱ्या भुयारी मार्गाचा उंचीबाबत विचारणा केली.

माननीय अध्यक्ष भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) च्या अधिकाऱ्यांना सूचित केले की, श्री जुवारी यांच्या सुचनेची दखल घेण्यात यावी, तसेच द्रुतगती मार्गाचा दुतर्फा वृक्षारोपण च्या सूचना केल्या.

माननीय अध्यक्ष यांनी सदर जनसुनावणी चा उद्देश पुन्हा एकदा स्पष्ट करून जनसुनावणीला उपस्थित सर्वांना धन्यवाद दिले. त्यांनी पुढे MPCB, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) च्या अधिकाऱ्यांना उपस्थित नागरिकांनी केलेल्या सूचना/तक्रारी याची नोंद घेण्यास सांगितले.

विशेषतः त्यांनी रायता गावातील पूरग्रस्त शेतकऱ्यांचा प्रश्न, वृक्षारोपण, ध्वनी पातळी मार्यादेच्या उपाययोजना यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यास सांगितले. तसेच माननीय अध्यक्ष यांनी उपस्थितांना त्यांची मते सूचना/हरकती या लिखित स्वरूपात MPCB च्या अधिकाऱ्याकडे सुपुर्त करण्यास सांगितल्या.

यावेळी ग्रुप ग्रामपंचायत, आंबेशिव यांचे कडुन हरकत प्राप्त झाली आहे.

माननीय अध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांना धन्यवाद देऊन ही जनसुनावणी पूर्ण झाल्याचे घोषित केले.

## सारांश

महाराष्ट्र राज्यातील वडोदरा मुंबई द्रुतगती मार्गाचा मुख्य आखणीच्या किमी २६.५८२ (स्पर आखणीचे डिझाइन किमी (०+०००) पासून सुरू होणाऱ्या व एम.एम.आर.डि.ए. च्या मल्टि मोडल कॉरिडोर सोबतच्या प्रस्तावित जंक्शन (स्पर आखणीचे डिझाईन किमी (७९+७८३) ला संपणाऱ्या ८ पदरी स्परची विकास परियोजनाची जनसुनावणी माननीय अप्पर जिल्हा दंडाधिकारी, ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

लोक प्रतिनिधी व स्थानिक रहिवासी यांनी जन सुनावणीमध्ये भाग घेऊन त्यांनी आपली मते, हरकती, अपेक्षा जमिनी संपदानाच्या बाबतीत घेतल्या तसेच सदर विकास कामामुळे, सभोवतालच्या परिसराचे वातावरण, समुद्रिय भूभाग जैविक व्यवस्था, पक्षी अभयारण्य, वन्यजीव संवर्धन, वृक्षारोपण, तसेच सादर प्रकल्पामुळे होणारे फायदे तोटे, परिसराचा होणार विकास याबाबत चर्चा करण्यात आली.

तसेच स्थानिक रहिवासी जमीन मालक शेतकरी याना असणाऱ्या शंकाबाबत प्रकल्प सल्लागारांनी शंका निरसन केले. माननीय अध्यक्ष--जनसुनावणी समिती सदस्य यांनी लोक प्रतिनिधी व रहिवासी यांनी नोंदवलेल्या मतांची नोंद घेतली.

माननीय अध्यक्ष यांनी MPCB आणि भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) च्या अधिकाऱ्यांना जनसुनावणी चे इतिवृत्त तयार करून ते सर्व संबंधित अधिकाऱ्यांना व सर्व संबंधितांना उपलब्ध करून देण्यात यावे.

याबरोबर सर्वांना धन्यवाद देऊन जण सुनावणी ची कार्यवाही संपल्याचे घोषित केले.

(श्री. शं.ल. वाघमारे)
प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, कल्याण
तथा सदस्य, पर्यावरण विषयक जनसुनावणी

(डॉ. शिवाजी पाटील)
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, ठाणे
तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी

(श्री. ज.शं. हजारे)
उप-प्रादेशिक अधिकारी, भिवंडी
तथा आयोजय, पर्यावरण विषयक जनसुनावणी